स. ग्रं. सं. ठाणें
विषय काव्य
सं. नं. ४४८

# महाराणा प्रतापसिंह

( खंडकाव्य )



REFBK-0003153
REFBK-0003153

ले० तिवारी

मराठी ग्रंथ संग्रहालय,
क्रमांक नं. ५५
ता. ५-२-५
ठाणे.

॥ ॐनमश्चंडिकायै ॥

काव्यकिरणमाला — किरण पहिला

# महाराणा प्रतापसिंह

( खंडकाव्य )

लेखक

दु० आ० तिवारी-जळगांव

संपादक व प्रकाशक

मि० का० भोरटके

काव्यकिरणमाला जळगांव

ग्रंथकर्त्यांनें सर्व हक्क स्वाधीन ठेविले आहेत.

जळगांव येथें बाबजी स्टीम प्रेसमध्यें

नारायण नरसिंह फडणीस यांनीं छापिलें

फेब्रुवारी १९२६

किंमत ८८

३१५३

REFBK-0003153

REFBK-0003153

# संपादकीय

काव्य ही एक समाधी आहे. विषयाशीं तद्रूप होण्याचें कवीचें मानसिक सामर्थ्य जों जों वाढत जातें तों तों त्या विषयाचीं विविध अंगें त्यास स्पष्ट दिसूं लागतात व त्यांच्या सौंदर्य दर्शनानें उत्पन्न झालेला आनंद शब्द रूपानें बाहेर पडला ह्मणजे त्यालाच आपण काव्य ह्मणतों ईश्वरी सृष्टिच मुळीं काव्यमय असल्यामुळें मानवी जीवितही काव्याहून पृथक् नाहीं. ह्मणून सृष्टि आणि मानवीजीवित यांच्या दरम्यानचे सर्व प्रत्यक्षाप्रत्यक्ष विषय काव्यांत येऊं शकतात. या सर्व विषयांचा दृक्प्रत्यय ज्यास स्पष्टतेनें येतो त्यालाच कवि ह्मणतात. हा दृक्प्रत्यय इतरांना येत नसतो असें नव्हे. पण त्यांच्या ठिकाणीं तो विशद करण्याचें सामर्थ्य नसतें. ह्मणून प्रत्येक मनुष्य कवि असूनाह त्याला आपण कवि ह्मणत नाहीं. तर अंतःसृष्टींतील अनुभव ज्याला शब्दसृष्टीनें व्यक्त करतां येतात व इतरांच्याहि गुप्त भावनांना जागवितां येते त्यालाच आपण कवि ह्मणतों.

साहित्यनिष्ठ लोकांनीं आपल्या मातृभाषेतील काव्यवाङ्मयाचें ऋण फेडावयाचें ह्मणजे अशाच सत्कवींनीं जन्म दिलेल्या काव्याच्या आदरानें फेडावयाचें असतें "काव्यकिरणमाला" ही असल्याच कार्याकारतां जन्म पावली आहे ईश्वरीकृपा असेल तर महाराष्ट्र भाषतील काव्यवाङ्मयाच्या सेवेन तिचें सार्थक होईल.

महाराष्ट्रांतील प्रसिद्ध सत्कवी श्री० **दु० आ० तिवारी** यांनीं माझ्या विनंतीस मान देऊन आपलें "महाराणा प्रतापसिंह" हें ऐतिहासिक खंड काव्य मालेस दिलें ह्मणून मी त्यांचा फार आभारी आहें.

जळगांव
महाशिवरात्र
ता० ११।२।२६

**मि० का० भोरटके**

# ग्रंथकर्त्याचे दोन शब्द.

जाज्वल्य देशभक्तीनें जे ऐतिहासिक थोरपुरुष सर्व भारतीयांच्या आदराला पात्र झाले त्यांत **महाराणा** प्रतापसिंह यांची गणना आहे. अकबराच्या बलाढ्य फौजेशीं लढतां लढतां राणाजीस राजत्याग करून गिरिकंदरांत आपली धर्मपत्नी व मुलेंबाळें यांसह दैवदुर्विलासांत दिवस काढावे लागले! राणाजीसारख्या निग्रही देशभक्ताच्या ह्या वनवासाचें चित्र माझ्या अंतःपटावर रंगले गेलें, त्यामुळें या काव्याचा जन्म झाला. राणाजींच्या वनवासापासून तों त्यांनीं पुन्हां आपलें गेलेंलें राज्य परत मिळविलें अशा आनंदांत या काव्याचा शेवट झाला आहे. रसपरिपोषाकरितां कथानकांत किंचित् फरक केला आहे.

'राधामाधव' या खंडकाव्याच्या अगोदर 'राणा प्रताप' हें खंडकाव्य लिहिलें तथापि त्याच्या प्रकाशनाचा योग त्या काव्यानंतर आला. काव्यरत्नावलीचे वयोवृद्ध संपादक श्री० **नाना साहेब फडणीस** यांनीं मार्मिक सुधारणा सुचवून काव्यरत्नावलींतून हें काव्य खंडशः प्रसिद्ध केलें. याविषयीं मला त्यांचे आभार मानणें अवश्य आहे. पुस्तकाची सर्व छपाई, बांधणी वगैरे बाबजी स्टीम प्रेसांतूनच केली आहे. पण त्यांत कंपोजचा खर्च वाचला आहे. इतक्या सुलभतेंत हें कार्य दुसरीकडे झाले नसतें.

जळगांव
१८।२।२६

दु० आ० तिवारी

मराठी ग्रंथ संग्रहालय
नं. ......
ना.

ग्रं. क्र. 3953
ग्रंथ, शाखा (ग्रंथालय)

# महाराणा प्रतापसिंह.

अतुल देशाभिमान व निःसीम धर्माभिमान या दोन गुणांनीं उदेपूरचा राणा प्रतापसिंह भरतखंडांत अजरामर होऊन राहिला आहे. राणाप्रताप यानें जेव्हां मेवाडचा राजमुकुट धारण केला तो काळ महत्वाचा होता. अकबराच्या प्रतापभानूनें उत्तर हिंदुस्थानांतील सर्व राजमुकुट तेजोहीन केले होते. त्याची मनधरणी करण्याकरितां कित्येक रजपूत राजांनीं त्यांच्याशीं आपल्या बहिणींचीं व मुलींचीं लग्नें लावून दिलीं. परंतु मेवाडच्या सिसोदिया वंशानें मात्र आपल्याला हा कलंक लावून घेतला नाहीं. मेवाडास स्वतंत्र राखून आपलें कुलही शुद्ध राखण्यास राणाप्रताप याचें शौर्य, धैर्य, मनोनिग्रह वगैरे अनेक गुण कसोटीस लागले. कांहीं झालें तरी अकबरापुढें मान लववायची नाहीं हा त्याचा दृढ निश्चय होता.

अकबराच्या अफाट फौजेनें प्रतापास उदेपूर सोडण्यास भाग पाडिलें. तेव्हां त्यानें कुमळमेर ही आपली राजधानी केली. तरी मोगली फौजेनें त्याचा पिच्छा पुरविला. अंबेरचा राजा मानसिंग याजबरोबर प्रताप जेवला नाहीं. या मानभंगामुळें तो सेलिमासह प्रचंड सैन्यानिशीं प्रतापावर चालून आला. वीस हजार मेवाडी रजपूत राणाजीच्या झेंड्या खालीं जमा झाले. हें १५७६ सालांतील हळदीघाटाचें युद्ध इतिहासप्रसिद्ध आहे. या प्रसंगीं प्रतापानें शौर्याची पराकाष्ठा केली. तीन वेळां तो ऐन गर्दीत घुसला व त्यानें मोगली फौजेचा धुव्वा उडविला ! १४००० मेवाडी रजपूत धारातीर्थी पडले व शेवटीं राणा-प्रताप यास आपल्या परिवारासह अरवलीपर्वताचा आश्रय करावा लागला ! तरी अकबराचा त्रास देण्याचा उद्योग चालूच होता. या वेळीं त्यानें ज्या आपत्ति भोगिल्या त्या आज केवळ इतिहासांत वाचल्या तरी अंगावर काटे येतात. जेवतां जेवतां मोगलांचा छापा आला हें ऐकतांच त्यास पुढचें ताट

सारून उपाशी २।२ दिवस फिरावें. लागे अशा स्थितींत केव्हां केव्हां त्याची व त्याच्या पत्नीची चुकामूक झाली ह्मणजे २।४ दिवस गांठी पडत नसत! अशाच एका प्रसंगाच्या आधारें हें काव्य लिहिलें आहे.

या खंडकाव्याचें ५ सर्ग आहेत. पहिल्यासर्गांत राणाप्रताप व त्याची पत्नि यांचा अरवलीपर्वतांतील वनवास वर्णिला आहे. २ ऱ्या सर्गांत प्रतापाची रमणी चुकलेल्या स्थितींत एका निर्झरणीच्या तीरीं एकटीच बसली असतां तेथें प्रतापास शोधणारी एक मोगल लोकांची तुकडी अचानक आली. तिच्या नायकानें भूपांगनेशीं कामुकतेनें लगट केली. तिनें त्यास कमरेच्या खंजिरानें ठार केलें. ३ ऱ्या सर्गांत तिनें उरलेल्या लोकांशीं युद्ध करून त्यांतील बहुतेकांस परलोकीं पाठविलें. इतक्यांत दुसरी तुकडी आली त्या तुकडीशीं लढतांना ती खड्ग प्रहारानें मूर्च्छित झाली. तिला तशा स्थितींत सेनानायकानें आपल्या घोड्यावर घेऊन तो जयानंदानें परतला. ४ थ्या सर्गांत राणाप्रतापास ती बातमी लागतांच तो भिल्लांचें सैन्य घेऊन निघाला व त्यानें सर्व मोगल कापून आपल्या अर्धांगीची सुटका करविली. हाच स्वातंत्र्य जयाचा शकुन मानून राणाप्रतापसिंहानें पुढें एकामागून एक हल्ले करून मोगलांच्या ताब्यांत गेलेला सर्व मुलूख सोडविला. मेवाडास स्वतंत्र केलें व उदेपुरांत प्रवेश केला. हा भाग शेवटीं ५ व्या सर्गांत आहे.

## सर्ग १ ला

सम्राट अकबराच्या असंख्य फौजेपुढें आपला निभाव लागत नाहीं असें पाहून राणा प्रतापसिंहानें अरवली पर्वताचा आश्रय केला. त्याज बरोबर त्याची राणीही वनवासाचें दु:ख भोगण्यास निघाली! तेव्हां प्रजाजनांना फार दुःख झालें. पशु पक्षी देखील रडूं लागले. राजमहालांत राहणारें, पंच पक्वान्नाची रुचि घेणारें तें राजदांपत्य भिल्लांच्या झोंपड्यांत कंदमूळावर दिवस काढूं लागलें!

एका बाजूस मांडीवर पत्नीचें शिर व दुसऱ्या बाजूस नंगी समशेर अशा स्थितींत राणाजींनें मोगलांची चाहूल ऐकत रात्रीच्या रात्री जागून काढाव्या. केव्हां केव्हां मोगलांच्या हातावर तुरी देऊन जातांना धांदलींत त्या पतिपत्नींची ताटातूट व्हावी ! शत्रूनें लगट केली कीं राणाजीनें संमुख होऊन युद्ध करावें व पुढचा मार्ग काढावा. जागोजाग अरवलीच्या लाल भडक झालेल्या शिला प्रतापाच्या शौर्याची साक्ष देत होत्या. हेरांनीं राणाजीच्या हाल अपेष्टांचें व त्याच्या शौर्याचें वर्णन अकबरापुढें केलें तेव्हां तो गहिंवरून ह्मणाला:– " वारे प्रताप ! त्वां आपलें ब्रीद राखिलें. त्वां आपल्या कुलाला कलंक लागूं दिला नाहीं. मला तुझें राज्य नको, तूं माझ्या दरबारांत येऊन मला एक वेळ सलाम कर ! " प्रतापसिंहानें आपली मान लवविली नाहीं, त्यानें विश्वासू व जीवास जीव देणारें भिल्लांचें सैन्य जमविलें. हा कथाभाग या पहिल्या सर्गांत आहे.

---

मराठी ग्रंथ संग्रहालय, ठाणे. नं. ता.

# महाराणा प्रतापसिंह.

## सर्ग १ ला.

मंदाक्रांतावृत्त.

**प्रतापसिंहाचा वनवासः-**

आत्मैश्वर्ये गगनिं विलसे जेविं चंडप्रताप[1]
राजस्थानीं नृप विलसला तेविं राणा ‘ प्रताप ’!
मेवाडाची मिरवित शिरीं राज्यलक्ष्मी प्रकांता[2]
स्वातंत्र्याच्या अतुल समरीं रक्त ओतीत होता ! १

होता वैरी अकबरशहा सैन्य--सामर्थ्यवान
भूपालांचीं लववि किरिटें रत्नदैदीप्यमान !
यातेंही तो प्रबळ घडवी राजसंन्यास--योग
देशप्रेमी सहन करिती प्राप्त दुर्दैवभोग ! २

त्याच्या शीर्षी तरु मिरविती चामरें पल्लवांचीं
वेली प्रेमें स्रविति वरुनी गंधमाला सुमांची
गाळोनी त्या किसलयपुटीं बाष्पबिंदु प्रभातीं
तत्दुःखाची हळहळ मनापासुनी दर्शवीती ! ३

जो दीनांना कठिणसमयीं आश्रयस्थान व्हावा
त्यानें का तो अरवलिगिरी आश्रयाला वरावा !

---

१ सूर्य २ तेजस्वी

मराठी ग्रंथ संग्रहालय
नोंद क्र. ५०८९
२१-९-१९५५
ठाणे,

जो अंबारीं नृप मिरविला दिग्गजीं वाहनांत
मेवाडाचा धनि भटकतो आज रानावनांत ! ४

तैं मोरांचे नयन गळती, कोकिळा मूक होती
दंती 'किर्र' ध्वनि करिति तैं सिंह आरावं[1] देती
विद्युन्माला चमकति, नभीं वर्षती मेघपंक्ति
भूपालाची स्थिति सकळिकां जाहली तापदा ती ! ५

**प्रतापाची धर्मपत्नी:-**

रामामागें जनकतनया कोमलांगी निघाली
तैं लोकांचे नयन भरले, लागले हात भाळीं !
तैसे दु:ख व्यथित जनही त्या प्रतापप्रियेला-
पाहोनीया पदर अपुला लाविती लोचनांला ! ६

कांतामागें निबिडविपिनीं आर्यदेवी निघाल्या
सीता देवी द्रुपददुहिता, भीमकी भूपबाला;
तो सेवोनी समुचित पथ श्रेष्ठ आर्य स्त्रियांचा
वर्णायाला विषय दिधला साध्विनें सद्यशाचा ! ७

तो मंदार्क क्षितिजगत, ती शुक्र बालेंदु--रेखा !
कीं तो भासे दिनकरमणी; तीहि संध्या विलोका !
सत्काव्याचा निधिच जणु तो, अर्थ--सत्संगती ती !
सद्भावाला अनुसरतसे काय कीं ईशभक्ति ? ८

---

१ शब्द

पाथोधीतें नदि अनुसरे प्रावृषीं[1] एकभावें
कीं पद्माच्या सह नलिनिनें क्षुब्ध लाटेंत जावें
मेघांतूनी विधु विचरतां चंद्रिका जाय जेवीं
सौख्यत्यक्ता सति अनुसरे ती प्रतापास तेवीं ! ९

तन्नेत्रातें बघुन हरिणी चालतां स्तब्ध होती !
पाहोनीया गजगति तिची, हस्तिणी थांबताती !
प्रासादाच्या वरुनिहि कधीं साध्वि यावी न खालीं
नाथामागें अहह ! विपदा भोगण्याला निघाली ! १०

मातेला जे चुकुन फिरती लोलनेत्रें वनांत
येती सारे मृगशिशु तिला मातृमोहें पहात !
तोंडामध्यें हरित तृण तें, कर्ण उंचावलेले
त्यां पाहोनी हृदय सतिचें होय अत्यंत ओलें ! ११

कष्टें केली मृदुतर जिची रम्य शय्या सुमांची
भीती जावी तरिहि न जिच्या कोमला सेविकेची !
ती मृद्वंगी विषमविपिनीं प्राणनाथानुषंगी
केव्हां भूमीवर कधिं शिलास्थानिं झोपे कुरंगी ! १२

शीतांशूचा किरणहि जिला उष्ण केव्हां गमावा
चंडांशूचा खरतर कसा ताप तीनें सहावा !

---

१ वर्षाकाल

चंद्रग्रावा[1] वितरुन जिचें आर्द्र व्हावें दुकूल
[2]तें [3]घर्मातें पुसुनि पुसुनी हाय होई मळूल ! १३

लाक्षारंगें[4] धवलचरणें रंगवीतां जियेचीं
व्हावी चित्रा वसुमति पतिप्रेम—संसेवनाची
पातिव्रत्यें विबुधजनता नित्य गाई जियेचीं
धूलीमाजी उमटति अहा ! पादचिन्हें तियेचीं ! १४

" देहें माझ्या सदृश दिसते कोमला अंगना ही
द्यावी शांती महिप—सखितें कोणत्या मीं उपायीं ? "
छायादानीं सजुन लतिका पल्लवाग्रांगुलींनीं--
बोलावीते निकट सखिला मल्लिका[5] अंकुरांनीं १५

आकाशींच्या चपल चपले ! नाच दावूं नकोस !
मेघा ! तूंही गडगड असा शद्ब काढूं नकोस !
त्या भीतीनें जरि सुमतिच्या देहिं येतील कांटे
थोडें पुण्य प्रथम करितां पाप लागेल मोठें १६

ज्यांच्या पात्रीं शशिसम मुखें गुर्जरस्त्रीजनांचीं—
पुण्यस्नानीं विलसति [6]सुरस्थानलुब्धाशयांचीं
त्या यद्देहीं विहरति ' मही-शर्वरी[7] ' भूप्रदेशीं
अद्रीनें[8] त्या हृदयिं वरिलें राजरत्नद्वयाशीं ! १७

---

१ चंद्रकांतमणी २ दुकूल ३ घामातें ४ लाक्षारंग ५ मोगरी ६ स्वर्गेच्छूंचा ७ मही व साबरमती ह्या नद्या ८ अरवली पर्वतानें

त्या दोघांचा शुचितर असा काननीं वास होतां–
भूमी होई सुमफलवती सुंदरा कांतियुक्ता.
छायावृक्षस्तबक–पवनें गंध वाही दिशांतें
धन्यात्मे ते सफल करिती संनिवास–स्थलातें ! १८

होते कांहीं अनुचर सवें राजभक्तस्वभावी
ज्यांनीं भूपव्यसनसमयीं तुच्छ काया गणावी !
ज्यांनीं शौर्यें [1]द्विषदरमणीहस्त भाळास न्यावे
त्यांनीं आतां विकलहृदयें भूपवक्त्रीं पहावें ! १९

जेथें शोभे रविकरपरावर्तनें रश्मिजालें[2]
ऐशीं ज्यांचीं स्फटिकमय तीं दालनें हो विशाल !
त्या दोघांचे रुचिरतर ते शून्य झाले महाल
ते भिल्लांच्या गलित–कुटजीं लोटिती ग्रासकाल ! २०

भिल्लीणींच्या नयनयुगुलीं सादरें वीक्ष्यमाना[3]
मेवाडाची भुवनजननी रूपसौभाग्यवाना
एका वस्त्रें निजतनु अहा! झांकते चारुगात्री
कारुण्याचें जळ उपजवी योगिनी जीवनेत्रीं[4] ! २१

**देशभक्ताची तळमळः–**

व्हावा कैसा रिपु–जित तरी देश मेवाड मुक्त ?
चिंतेमध्यें नरपति बसे देहनिद्रा–वियुक्त

१ शत्रु २ किरणसमूह. ३ पहाण्यास योग्य. ४ मनुष्यमात्राच्या नेत्रांत

थोडीशीही वनपशुमुळें कर्णिं चाहूल येतां
'आले का ते यवन ?' उचली खड्ग तो म्लेंच्छहंता ! २२

अंधाराचे पट पसरिले रात्रिनें भोंवतालीं
नैराश्याची नृपमनिं तमोव्याप्ति अत्यंत झाली !
व्योमांतोनी घनजल जसें वर्षतें भूमिभागीं
तैशीं गाळी नयनसलिलें जन्मभूमी-वियोगी ! २३

अंकीं निद्रागत सखिमुखीं ठेवि एका कराशीं
चिंताग्रस्त स्वमुख धरितो अन्यहस्तीं उदासी !
त्यातें वाटे रजनि अजुनी लुप्त होई न कैशी ?
दुःखावस्था कठिन दिन ती भासवीते पळाशीं २४

व्हावी देशस्थिति उचित, ही लागली ज्यास ओढ
बालार्काच्या अरुण किरणीं पाहतो तो चितोड
दुःखोद्वेगें अविचल तदा स्तब्ध होऊन पाही
निःश्वासाची पवनलहरी त्यावरी एक वाही ! २५

तो किल्ला, ते बुरुजहि जिथें सैन्य दिल्लीश्वराचें
क्षुब्धाब्धीची उसळत जणो लाट एकेक नाचे !
सामंतांचा अभिनव यशःकेतु तेथें दिसे ना
बालेंदूचा ध्वज चमकवी मोगली भव्य सेना ! २६

राठोडांच्या समररुधिरीं वाहिली जी प्रणाली[1]
तद्गंधानें वनपशु तिथें हिंडती भोंवताली !
जोहारांनीं तरुणि इतुक्या अग्निकुंडांत गेल्या--
कीं अस्थींनीं गिरिवरगुहा दर्शनक्रूर झाल्या ! २७

गेलासी तूं हर ! हर ! परी पारतंत्र्यीं चितोडा !
त्वदुःखाचा करिल जन तो कोण आतां निवाडा ?
नामामागें प्रियपद अशी लावितों ' सिंह ' ऐसें
देशत्यागा करविति परी शत्रु हे दुष्ट कैसे ? २८

ज्याच्या शीर्षीं रवि करितसे देहविश्रामलीला
स्वातंत्र्याचा ध्वज तव शिरीं भव्य आरूढलेला
म्यां पाहावा परम वसते एक ही जीविताशा
होवो झाला महति तरि मी देइ ना देह-नाशा ! २९

**देशभक्ताची अर्धांगीः-**

तीरोद्भूत स्फुरवित नव्या यूथिकांचा[2] विहार[3]
वाहे रेवाजलपरिचित प्राण्हे[4]कालीं समीर
तो राज्ञीचा मुखपरिमला[5]कांक्षि देहानुकूल
मंदावेगें करि हळु मुखाच्छादनाचें दुकूल ! ३०

गौरी अर्धोन्मिलित--नयना प्राक्स्फुटाब्ज--स्वरूपा
हस्तें बद्ध प्रथम करिते मुक्त वेणी--कलापा

---

१ रक्ताचे पाट २ जाईची वेल ३ बगीचा ४ सकाळीं ५ समीराचें विशेषण.

वृक्षीं वृक्षीं खगतति जिची कीर्ति गाऊन धाली
कांतांकाच्या गिरिवरि उषा झोंपलेली उदेली ! ३१

यद्वेणीशीं घनतति वळे कृष्ण शोभा तुलाया
शैलस्थानीं तिजहि अतुला वाटली भूपजाया !
कैसा व्हावा उपमित तरी तो पिसारा शिखीचा ?
किंवा तुल्य स्तबकहि कसा तो तमालद्रुमाचा ? ३२

अभ्रच्छायागत शशि जसा एकदां स्पष्ट व्हावा
तत्कांतीनें कुमुदिनि-मुखीं हर्ष कांहीं दिसावा
तो निस्तेज क्षणिं शशि दिसे, तीहि तेजोविहीना
तैशी राज्ञी पतिसह दिसे सौख्यदुःखीं विलीना ! ३३

केव्हां होई मुदित महिपोत्साह[1] पाहून तीही
केव्हां चिंताकुल बघुन त्या दुःखभारास वाही
दीपज्योती रुचिर अथवा मंद तेजानुवर्ती
सौख्यीं दुःखीं अनुचर तशी होय ती शीलवंती ३४

कैशी येई अवनिं अमरप्रार्थनायोग्य ही स्त्री
पाहायाला गिरिवराशिरीं प्रत्यहीं मेघ येती !
कोषागारीं नवरुचिरता राजराजेश्वराची
स्त्रीरूपानें प्रगटिलि जणों, कल्पना मानसाची. ३५

---

१ प्रतापाचा उत्साह.

पक्वान्नाच्या सम गणुनि ते सेविती कंद तेथें
ओढा वाहे झुळ झुळ तिथें सेविती जीवनातें
शैलारण्यीं मुळिं न मिळतां कंदमूलादि केव्हां
प्राशोनी ते सलिल नुसतें काढिती वेळ तेव्हां ३६

**पर्वतांतील युद्धः--**

शोधायाला यवन जवळीं पातले आपणाशीं
वार्ता येतां त्वरित पळणें त्यास लागे उपाशी
केव्हां केव्हां उलटुन करी युद्ध सक्रोधरीतीं
रक्तस्रावें अरवलिगुहा देति चित्तांत भीती ३७

हातामध्यें रुधिरमय तें खड्ग, पाठीस ढाल
मागें मागें बघत नृपती-सिंह चाले कराल !
वृक्षच्छायातळिं बसुनि जों देहविश्रांति घ्यावी
तों वैऱ्यांचे कटुरव पुन्हा ऐकुनी ओठ चावी ! ३८

तो शैलाच्या गुहिं उडवुनी शत्रुचे देहखंड
दोर्दंडाच्या विभव मिरवी शौर्यशाली प्रचंड
विच्छिन्नांच्या प्रवह रुधिरीं देह होऊन लिप्त
जास्वंदीचा ललित फुलला कुंज वाटे प्रताप ३९

पृष्ठस्कंधी असिधृतकरें वीर जों घाव घाली
त्या आघातें गिरिसम तनू शत्रुची तैं निमाली

कोठें दिल्ली, अरवलिगिरिप्रांत हा दूर कोठें ?
कोणाला ना नियम करवे मृत्यु येईल कोठें ? ४०

रक्तस्थानें वनचरवधू भ्रूविलासें पहाती
तन्नेत्रांची रुचिर पसरे त्यावरी नीलकांती
वाटे गेला द्विरद[1] करुनी काय उत्खात–केली ?
ऐशी रम्या अचलवसुधा कौतुकस्थान झाली ! ४१

एकामार्गीं महिपवनिता अन्यमार्गीं नृपाल
ऐशी होई विरहगति तैं कंठिती तेहि काळ !
त्या दोघांची स्थिति जणु हरिश्चंद्र–तारामतीची
सच्छीलांची विषम विधि कां घे परीक्षा उगाची ? ४२

रानोरानीं उभय विरही अंतरप्रेमयोगी
जेव्हां चिंताकृश फिरुनि ते भेटती दैवभोगी
तो तेव्हांचा प्रियजनसमानंद वर्णील कोण ?
प्रीतीकाव्यें कितिहि लिहिलीं तीं न होतील पूर्ण ! ४३

**अकबराची इच्छा:--**

देशासाठीं श्रम करुनिया कष्टवीतो तनूस
ऐकोनी तो अकबरशहा दुःखभारें मनास--
बोले,–" मान्या ! रजपुतकुलीं धन्य तूंच प्रतापा ! "
संरक्षाया स्वकुल जगतीं सोशिशी देहतापा ४४

---

१ हत्ती

कन्या किंवा भगिनि मजला देउनी तोषवाया
त्वज्ज्ञातीचे नृपति सजले धर्महानी कराया !
श्रेष्ठा ! केलें कलुषित न तूं आपुल्या सत्कुलाला
होती धर्मच्युत न बुध ते, मृत्यु येवो तयांला ! ४५

त्वद्राज्याची खचित हृदयीं अल्प नाहीं मनीषा
देतों राज्य प्रिय तव तुला, एक आहे मदाशा
या सम्राटापुढतिं अपुली अल्प वांकीव मान
रत्ना ! तूंतें शिरिं धरुन मी श्रेष्ठ देईन मान ! ४६

मोठे मोठे समरविजयी स्तंभ जे वैभवाचे
साम्राज्याचे किरिटमणि जे प्राण माझ्या जिवाचे
त्यांच्या वक्षीं निजपद दिला, चारिली धूळ त्यांना
राजस्थानीं तुजसम असा तूंच कीं एक राणा ! ४७

मी त्वद्वैरी, परि नृपवरा ! त्वद्‌गुणांचा प्रणेता
दोंहातांनीं कवळिन तुला येथ नेत्रीं पहातां
पायीं केले नत जरि बिकानीर म्यां जोधपूर
मातें धन्याश्रम न गमतो तूं न येतां समोर ! " ४८

**प्रतापाचा निश्चयः--**

सत्वाढ्याच्या फिरतिं नयनीं पूर्वजांचीं चरित्रें
लोभावेशें शिर न अपुलें वांकवाया प्रवर्ते !

मराठी ग्रं. संग्रहालय नोंद ४०८८ २१-८-१९५५ ठाणे

ऐसें रत्न प्रसवुन जिनें भूषवीलें महीला
देई ना हो ! कवण जन त्या धन्यता माउलीला ? ४९

कष्टें काढी विचरत वनीं भूपती दुर्दिनास
शौर्यें धैर्यें करि वनचरप्रीति–आकर्षणास
जैसे होती बकुल विटपीं भृंग गंधानुलुब्ध
तैसे झाले वनचर अहा ! तद्‌गुणोत्कर्षबद्ध ! ५०

कैलासाचा अधिप गिरिजानाथ जो एकलिंग
सेवा त्याची क्षितिपति करी एकनिष्ठें अभंग
भिल्लीणींचे तनय तरुण प्रीय आत्मांशभूत
प्रेरी रायाजवळ सहजीं नीलकंठ प्रभूत ! ५१

ज्यातें ' स्वामी ' ह्मणतिल मुखें आपुला एक वेळ
त्यातें केंव्हां त्यजितिल न ते, कापला कंठनाल !
सिंहाशींही झगडातिल जे, मित्र ते काननाचे
प्रेमें झाले अनुचर तया वीरवंशोद्भवाचे ! ५२

मेघश्यामप्रभ तनु, तसें धैर्यही अंतरंगीं
धारावृष्टीमय करितिल क्षोणितें युद्धरंगीं
विद्युत्तेजें अधिप चमके त्यांत राणाप्रताप
वाटे गोळा तुटुन पडतां तीव्र देईल ताप ! ५३

अद्रिद्वारस्थित हरि करी गर्जना क्रूरतेनें
कीं तीरांतीं जलनिधि करी घोषणा ज्या प्रमाणें
तैसा होई यवनचमुशीं सज्ज तो सत्प्रतिज्ञ
" देशासाठीं तळमळ जया, काढितो मार्ग सुज्ञ " ५४

---

## सर्ग २ रा.

राणाप्रताप व त्याची पत्नि या उभयतांची चुकामूक होऊन ती एका गिरीनिर्झरिणीच्या तीरीं एकटीच बसली असतां राणाजीस शोधणारी एक मोंगलसैन्याची तुकडी तेथें आली. त्या सैन्याचा अधिपति तिच्या सौंदर्यानें कामलोलुप झाला. तिनें त्या प्रसंगीं धैर्य धरून त्याची निर्भर्च्छना केली. तथापि तो विषयमूढ शुद्धीवर येईना. तेव्हां त्या साध्वीनें मागें मागें सरून त्यास न कळत एका कुंजाआड नेलें व तेथें त्यास एकदम खंजिरानें ठार केलें !

**शरद्वर्णनः-** मंदाक्रांतावृत्त.

वर्षाकालीं कृषिजनमनोत्साहसंवर्धिणारी
होई लुप्ता नभिं धनतती धान्यसंमृद्धकारी
कामीलोकां उपकृत करी योषिदालिंगनांनीं
वर्षा गेल्यावरि नव शरत्काल येई नटोनी ! १

शैलीं शैलीं रुचिर दिसती मुक्त तोयप्रताप
पक्षिश्रेणी तरुतरुशिरीं गुंग गानोत्सवांत
क्षेत्रीं क्षेत्रीं हरिणगण ते धावती संगतीनें
वाटे चित्तीं नव वसुमती हांसते मुग्धतेनें ! २

**निर्झरिणीच्या तीरीं:-**

कांठीं कांठीं कुसुमितलता, वृक्षराजी वरून
पात्रीं तैसें तलगत शिलाखंडही दृश्यमान
वाहे ऐसा धवल सलिलें ओघ कल्लोलिनीचा
आला कंठच्युत जणु महीं हार देवांगनेचा ! ३

गौरांगांच्या कुरळ अलकां आननीं सारणारा
संमोहानें चपल गतिनें तन्मुखें चुंबणारा
वाहे प्रातःसमयसुरभी पद्मनीखंड–वायू
बिंबोष्ठींचे शिथिल करितो कांतकंठस्थ बाहू ! ४

विश्रामाचें स्थल गणुनि ज्यां सेविलें कुंजरांनीं
आनंदाचें गृह मधुकरां वाटती कुंज रानीं !
त्यांची ऐशी रुचिर विलसे पंक्ति पुष्पोद्गमानें
केली वेणी ग्रथित कुसुमीं कीं वनश्री सतीनें ! ५

तेथें बैसे अभिनवलतातुल्य नेत्राभिरामा
ती पूर्वोक्ता नृपति–रमणी चारुनेत्रा ललामा
येती मोहें मधुकर मुखीं श्वासगंधानिलानें
घेवोनी ती कमल, कमला वारि त्यांना[२] तयानें ! ६

त्या भृंगांना कमल, मुख, हा भेद कांहीं कळे ना
वारायाच्या कमलमुखिच्या[३] सिद्धि ये ना श्रमांना !

---

१ वरच्या भागावर २ भृंगांनां ३ प्रतापरमणीच्या

वक्षीं किंचित् पदर सरला मात्र सीमंतिनीचा !
पृष्ठांगाशीं निवह रुळला कृष्ण धम्मिल्लिकेचा[1] ७

खिंडी खोरें कितिक फिरलीं, पाय गेले थकून
जीवाचा तो जिवलग कुठें तीस दावील कोण ?
होती तेथें रमवित मना देहविश्रांति घेत
ती सूर्येच्छ्र कमलिनि जणो होत होती प्रतीत ! ८

दोन्ही तीरीं तरु पसरले वल्लिका वेष्टिलेले
कांहीं कांहीं किरण शिरले पल्लवांतील जालें
कर्णीं पक्षिध्वनि ' कल कल ' स्पष्ट तो येत होता
आपत्तीची भयद तिजला सूचना देत होता ! ९

वायू वाहे उलट गतिनें सूचवी त्या सतीला
जाई बाले ! परत, इथुनी सत्वरीं आश्रमाला !
संकेताचा सरळ मतिला अर्थ कैसा कळेल ?
' होणारें जें विघटित तें केविं सांगा टळेल ? ' १०

दिक्प्रांताचा दिसत नव्हता भाग झाडीमधूनी
झाडी डोले तइं गिरिशिरें येति कांहीं दिसूनी
पर्णांचा तो प्रतिरव तिला भावि भीतीस दावी
साध्या भोळ्या वनहरिणिला कल्पना केविं यावी ? ११

---

१ केशकलाप

मोगल स्वारः-

ऐकूं येती तुरगचरणोद्भूत ते शद्ब कानीं
शंकास्पृष्टा हरिणि बघते मान ती उंचवोनीं !
पादोत्कीर्णा दिसत नव्हती धूलि आकाशभागीं
तीतें वाटे उगिच पडलें संशयीं मी अभागी ! १२

येतां येतां जवळि जवळी नाद आला हयांचा
तीरोपांतीं तृषित वळला संघ त्या सैनिकांचा
वर्णोच्चारें तिजसि कळलें स्वार हे मोगलांचे
शोधायाला अदय फिरती शत्रु जीवेश्वराचे ! १३

जावें कोठें कठिण समयीं काय आतां करावें
ऐशी भीती नृपरमणिला वाटली स्त्री-स्वभावें
ये एकाकी कठिण घटिका गोंधळे धैर्यवान
ती जातीची अबल अबला होय चिंतानिमग्न १४

जाळ्यामध्यें अवचित जशी सांपडावी कुरंगी
काकोलांना बघुन दचके कोकिला अंतरंगीं
कीं व्याघ्रांनीं परिवृत जशी धेनु कांपे थरारा
तैशा तीच्या उठति शरिरीं भीतिनें घर्मधारा ! १५

श्रीरामानें असुर सगळे नष्ट केले शरानें
ऐशा गोष्टी श्रवण करितों, वर्णितीही पुराणें

हे कोठोनी मग उपजले दैत्य तद्वंशभूत ?
ऐशी शंका मनिं उपजली तीहि होती सयुक्त ! १६

अश्वाखालीं उतरुन तिथें देहविश्रांती घ्याया
स्वामी त्यांचा, तदनुचर ते पातले नीर प्याया
जैसा कृष्ण द्विरद पुढतीं, मागुनी यूथ त्याचा
ऐसा त्यांचा विधि गमतसे संप्रवेशावयाचा ! १७

मध्यें टोपी, वर भरजरी बांधिले भव्य फेटे
विंध्यारण्यासम पसरले केंस दाढींत वाटे !
ऊर्णायूचें वसन शरिरीं शुद्ध तद्वर्ण काळा
व्योमांतूनी जलधर जणों पातले त्या स्थळाला ! १८

विक्राळांचे हयहि दिसती भव्य तैसे कराल
ज्याच्या त्याच्या कटिस दिसलें खड्ग, पाठीस ढाल !
अन्योन्याशीं वदत असतां शद्ब येतात कानीं
भाषा त्यांची अपरिचित ती ' पुस्तु ' किंवा ' पठाणी ' १९

क्षोणींद्राची महिषि उठली, आवळी कृष्ण वेणी
कर्णीं रत्नें तंव झळकलीं भूषणें ताम्रवर्णी
श्रोणीभागस्खलित रुचिरा मेखला सांवरोनी
आविर्भावें शरिरिं सजली चंडिका शूर राणी ! २०

दा. क्र. 3753



वाटे कन्या जणुं तरणिची त्र्यक्षरा लोकमान्या
मान्यांनींही स्तवन करण्या योग्य संध्या वदान्या
धन्या कीर्ती बुधवर जिची गाति पावित्र्यजन्या
अन्यायी ते यवन कसली योग्यता होय त्यांना ? २२

विश्रब्धाक्षी मुख फिरवुनी शून्य दृष्टीस लावी
ना दृक्तेजें पतित शरिरें पावनीभूत व्हावीं.
जाऊं लागे मृदुलचरणीं मंद मंद क्रमानें
' प्यारी ! ' ऐसा अरिवदनिंचा ऐकिला शद्ब [3]तीनें ! २२

विद्युद्वेलीसम चमकली संमुखी होय काली
नीला कांती लपुन नयनीं ताम्रता तूर्ण आली
बिंबोष्ठीनें ललित अधरीं चावुनी दंश केला
भालोपांतीं भ्रुकुटिलहरी होत होत्या विलोला ! २३

**यवनाधिपः-**

" ज्याच्या शीर्षी विविध डुलतीं चामरें छत्र त्यानें-
त्वत्प्रीतीचें अमृत मिळण्या नम्र व्हावें नृपानें
योषिद्रत्न त्यजिल न कुणी अप्रयत्नोपलब्ध "
बोले ऐसा अधिप, मशक ज्योतिला होय लुब्ध ! २४

" स्त्री जातीच्या सुरुचिर अशा भूषणा सोडणारा
रानोरानीं मज चुकवुनी जीव संरक्षणारा

१ सूर्याची २ सूर्य कन्या गायित्री. ३ त्या प्रताप स्त्रीनें.

योद्धा कैचा, अति पळपुटा, नांव मात्र 'प्रताप'
त्याच्या संगें अजवरि तुवां भोगिला फार ताप ! २५

जाते कांते ! फुकट तव ही सुंदरा यौवनश्री
म्यां बोधावें तुजसि परि तूं अज्ञ सामान्य न स्त्री
हा जो शैलासम दिसतसे वीर एकेक येथें
तो सेवील प्रिय गुणवती सत्य तूझ्या वचातें ! २६

स्वस्फूर्तीनें सुचति उपमारम्य ज्यातें विचार
त्यांचें काव्यीं ग्रथन करण्या ज्यास साहित्य फार
सौंदर्यांगे ! दिसलिस न कां श्रेष्ठ ऐशा कवीतें ?
माझ्यापेक्षां करिल सखये ! तो तुझ्या वर्णनातें ! २७

मातें साधा पुरुष न गणीं, थोर आहे अमीर
संपत्तीचा मम सदनिं गे ! वाहतो नित्य पूर
मत्संसारीं फुलशिल जरी कल्पवेलीसमान
मातें भूमीवर उतरला स्वर्ग वाटेल कां न ? २८

होतां खिन्न स्वमन तुजला एकदां गे ! पहावें
होतां चित्त क्षण विचल तैं कंठशद्व श्रवावें
होतां त्रास क्षणभर तुझ्या संनिधानीं रहावें
तीं तीं दुःखें हरतिल झणीं यक्षिणी त्वत्प्रभावें !" २९

**प्रतापरमणीः–**

कामांधाच्या श्रवण करुनी स्वैर संभाषणातें
ती राहूच्या पुढति वितरी मोहिनी वाक्सुधेतें
" कोठें सिंह प्रबळ मम, तूं जंबुका ! क्षुद्र कोठें ?
कां मर्यादा त्यजुन करिशी, घातकी धाष्टर्य मोठें ? २०

आत्मप्रौढी करित तुझिया सारखे वीर गेले
ना श्वानांच्या मुखिं चघळण्या हाड त्यांचें मिळालें
यद्वाहूच्या वरतिं विजयश्री सदा राजियेली
त्या सिंहाची प्रियतम सखी जंबुका ! वांछियेली ? २१

सिंही सिंहा समुचित असे, ती न तैशी शृगाला
हंसी हंसा समुचित तशी ती नसे वायसाला
हें सारेंही कळत असतां धृष्टता दाखवीशी ?
' कामी लोकीं बघति न कधीं पात्रतापात्रतेशीं ' २२

हें आर्येचें व्रत, पति जिथें तेथ जावें तियेनें
ती रानाला उपवन गणी नाथ–सत्संगतीनें
मोहीना तें स्वसुख तिजला सारिलें जें मतीनें
संपत्तीनें मन न चळतें भारिलें संस्कृतीनें २३

मातें झाली सुचरित–फलप्राप्ति जन्मार्जिताची
भाग्यें झाल्यें जगिं सहचरी देशभक्तेश्वराची

तूं भ्रष्टात्मा, विषम करिशी बोध चित्तभ्रमानें
सारासारस्मृतिहि नुरते नीच कामांधतेनें ३४

जो ' अल्लाहो अकबर ' अशा जागवी घोषणेस
तो ढोंगी, तूं कपटपटु कीं त्या गुरूचाच शिष्य
कापट्यानें हळुच गिळितां दीन एकेक मत्स्यी
या नक्राशीं जपुनिच रहा गांठ आहे जिवाशीं ! ३५

' आह्मी शौर्यें हतबल करूं अंगवंगादि देश
येथें आणूं, नमवुं चरणीं, काबुलाचा नरेश
जाऊं जेथें ह्मणशिल तिथें, जाउं ना त्या ' प्रतापीं '
दिल्लीशाला विनति करिती वीर त्याचे प्रतापी ! ३६

दुर्दैवानें जरिहि घडली योजना याच देशीं
लावोनीया बसति सदनीं हस्त भाळप्रदेशीं
आतां कैच्या घडतिल पुन्हा भेटि, या संशयांनीं
कांतापाशीं रडति यवनी संभ्रमालिंगनांनीं ! ३७

ऐसा ज्याचा त्रिपुरविजयी भव्य रुद्रावतार
संहाराया जणु अवतरे पातकी भूमिभार
कीं राणाजी प्रियतम जगत्सिंह पार्थावतार
चामुंडेला निजभुजबळें अर्पिती मुंडहार ! ३८

यद्वाहूची समरपटुता देइ वीरांस मोद
आकाशींचे अमर करिती दुंदुभीचे निनाद
आश्चर्यानें स्तिमितनयना कौतुकोद्‌भूतचित्ता
होती भीतिश्लथित अमरी युद्ध त्यांचें पहातां ! ३९

होताशी कां अतुल हळदीघाट युद्धांत सांग ?
आयुष्याचा पळुन वद कीं वांचवीलास भाग ?
घायाळांच्या अजुन सुटल्या गेहिं नाहींत शय्या
वैधव्याच्या कुहरिं वद कां लोटिशी आत्मजाया ? ४०

जेव्हां हत्तीवर उसळला चैतकाचा लगामी
सेलीमाची तनु थरथरे, सांडिली युद्धभूमी
होतें कांहीं सुकृत पदरीं वांचला राजपुत्र
शाहा होता न तरि सदनीं पुत्रदुःखास पात्र ! ४१

जेव्हां बाहू मिरवित शिरे युद्धसारंगधीर
प्रत्येकाला प्रखर गमला प्राणहारी प्रहार !
एका सिंहावर अखिल जैं शस्त्रधारी मिळाले
राणाजी हा रणचतुर तैं तीन वेळां उडाले ! ४२

धारातीर्थीं इतुकि पडली प्रेतराशी मृतांची
कीं श्वानांना कितिक दिन ती मेजवानी तयांची !

रक्तक्षारें तृण न उगवे जाहले रुक्ष घाट
पूर्वालोभें वसति अजुनी वन्य तेथें विराट ! ४३

ऐसा क्लेशप्रद परजनां भूप संतप्तभानू
आत्मीयांना विधुसदृश, मी चंद्रिका काय वानूं ?
आहे त्याची तुजहि विदिता धर्मवीरांगना हीं
कष्टें केलीं सहन यवना बोलणीं तापदाई ! ४४

केली रूपस्तुति बहुत, मी ऐकिली कष्टतेनें
ईच्छा नीच प्रकटिलि तुवां आत्मसंभावनेनें
वर्णीताती बहुगुण विषस्वार्थलोलूप पापी
" नाहीं सारें जगत फसणें शक्य भाषाकलापीं " ४५

ती वाणीनें मधु कलवती कोकिलाकंठहारी
द्राक्षावेलीसम रसवती अर्थमाधुर्यधारी
किंवा मंजुध्वनिमय अशी सुंदर देववीणा
कीं दिव्यार्थप्रसवि कविची बोधवाणी प्रवीणा ! ४६

होई स्तब्धा, अधिक न वदे जेविं आकाशवाणी
जाणोनी त्या अधम, शिणवी आणखी ती न वाणी
कोणालाही गमलि असती तद्वचांची शिराणी
आणीना तो विषयहृदयी एकही शब्द कानीं ४७

पाप्यास शिक्षाः-

'प्यारी ! प्यारी !' करित पुढतीं पातला कामचेष्टी
मागें मागें सरुन शिकवी ती सदाचार गोष्टी
गुंफेमागें न कळत तया नेइ ती पापियातें
घ्यावा अंतीं बलि ह्मणुन कीं कालिका ओढि त्यातें ! ४८

एका हातें खुणवुनि तया चंडिका धाक दावी
वस्त्राखालीं न कळत दुजा हस्त शस्त्रास लावी !
दृष्टी दृष्टी वरुन न चळे बोलतांना मुखानें
व्याघ्री भक्ष्यावर बघतसे उग्र अव्यग्रतेनें ४९

आयुष्याची भरलि घटिका तोंच दुर्बुद्धि होई
अग्निज्वालेवर मशक तो दुष्ट धावून जाई !
तों साध्वीचा कर उसळला केवळ प्राणहारी
खंजीरानें उलथुन झणी पाडिला पापचारी ५०

विद्युत्क्षोभें उमळुन महीं वृक्ष जैसा पडावा
कीं तोफेनें बुरुज वरचा खालतीं कोसळावा
कीं बंधारा नव तटनिनें आदळावा धडाडा
'अल्ला ! अल्ला !' ह्मणत गतिला पावला कामवेडा ! ५१

आक्रोशानें स्थल सकल तें जाहलें नादमग्न
चापल्यानें चपलमति तत्खड्ग घेई हिरून

रक्तस्रावें वसन भिजुनी पूर वाहात होता.
पापाचारी मरणसमयीं आकळ्या देत होता ! ५२

---

## सर्ग ३ रा.

मोगल सेनापतीस राणा प्रतापसिंहाच्या धर्मपत्नीनें ठार केल्यानंतर त्याच्याच हातांतील तरवार घेऊन ती निर्झरणीच्या तीरावर इतरांशीं युद्ध करण्यास सज्ज झाली. तिनें त्यांतील बहुतेक सैनिकास रणतीर्थी निजऊन रजपूतवीरांगना हें नांव सार्थ केलें. इतक्यांत दुसरी टोळी आली. तिच्याशीं लढतां लढतां ती मूर्छित झाली. त्या सेनापतीनें तिला तशा विमूर्छ स्थितींत आपल्या घोड्यावर घेऊन तो जयानंदानें परतला.

**वीरांगनेचा संग्राम** शार्दूलविक्रीडित.

तीरोत्तीर्ण उभी, जणो गिरिवरी ती दैत्यसंमर्दिनी !
अंत:शक्तिविलासिनी चमकली आकाशसौदामिनी !
किंवा येइ वसुंधरेंतुन गमे संतप्त ती नागिणी !
हाताची जहरी फणा उभविते ताम्रप्रभालोचनी ! १

देहीं होय उदार संगरवती भूलोकपालांगना
झाडींतून उफाळले करुनिया योद्धे महागर्जना
तेव्हां भासति ते पयोधर, गमे ती त्यांत सौदामिनी
अद्रीचीं शिखरें, लता तरुविना कोणी न तत्प्रेक्षणीं २

जेव्हां कोषविमुक्त खड्ग भंवती नाचावया लागती
त्या ज्योतिष्मतिभोंवती उगवले कीं धूमकेतू अती

ढालेचा मिरवीत हात चपला[1] जेव्हां उडाली जवें
वाटे विश्वविलासिनी लढतसे अंबाच दैत्यासवें ३

रक्ताचे उडती तुषार भंवतीं आरक्त झाल्या दिशा
धूळीच्या पटलांत सूर्य लपला नेत्रांस भासे निशा
तेथें युद्धचमत्कृतीस बघण्या जे देव आले नभीं
दृष्टीला नव्हते वरी दिसत ते त्या धूलिबद्धप्रभीं ४

मागें ठेवुनि एक पाय, पुढतीं देहास ती तोलुनी
घाली धाव शिरावरी उसळुनी आवेशपूर्णाननी
तद्देहस्फुटशोणितौघ वरतीं लागे उडूं जेधवां
देती वाट भटास देव गगनीं स्वर्लोक सेवावया ५

आधीं कृष्ण, फिरून रक्त पुढतीं झाली मही पांडुरा
आमूलाग्र विवर्ण वृक्ष दिसती झाल्या दिशा भेसुरा
आकाशांतिल मेघमंडळ गमे पृथ्वीवरी पातलें
ऐशी धूसरता तिथें पसरली संग्रामधूलीमुळें ६

एकाचें शिर तोडुनी भट दुजा लोकांतरीं पाठवी
कोणाचा मुरडून हात चुकवी कोणास घायाळवी
जेथें ती दिसली क्षणीं न दिसली गेली त्वरेनें कुठें ?
अश्वारूढ विपक्षियांस चुकवी, गावें किती शौर्य तें ७

---

१ प्रतापरमणी.

झाला केश–कलाप मुक्त, तिजला शुद्धी न त्याची परी
झाला शोणितलिप्त देह गमली ती कालिका भेसुरी
रक्ताचा परि एक बिंदु पडला नाहीं तिचा भूवरी
ऐशी ती अबला महाप्रबलही योध्यांप्रती नावरी ८

कोणी ओरडती, कुणी क्षितितळीं घायाळ आक्रोशती
अस्ताव्यस्त रणांगणांत पडली प्रेतें भटांचीं किती
कोणी दुःखभरांत धैर्य धरुनी चालावया लागती
होती एकच दुःखमुक्त ललना ती मात्र राजन्वती ! ९

दुष्टाच्या करिं राहुनी प्रतिदिनीं जें सज्जना कांपवी
राजस्थाननृपाळधर्मललना खड्गास त्या नाचवी
शोभे खड्ग तिचें प्रदीप्तकिरणीं विद्युत्प्रभेच्यापरी
किंवा इंद्रधनुःप्रभा पसरली संग्रामभागावरी १०

सिंधूची लहरी विलास करिते जैशी तटोपांतिं ती
पाषाणावलि विद्रवून उसळे ज्वाला ज्वलत्पर्वतीं
तैशी विक्रमशालिनी नृपसखी उत्साहसंवर्धिनी
देवी दैत्यविदारिणी विलसली स्वातंत्र्य–युद्धांगणीं ११

मेवाडी रजपूत संगरकलावेत्ते जसे निग्रही
तैशी युद्धविशारद स्त्रिजनता ये शत्रुच्या प्रत्ययीं

ऐशांच्या सुकुलांत जन्म घडणें, सामान्य का लाभ हा ?
होते पूर्ण रणांगणांत सहजीं स्वर्लोकलाभस्पृहा १२

सूर्यानें मुख झांकलें घनपटीं त्यां चंडिकादर्शनीं
चंद्राचें तर नांवही न उरलें कोठें नभःप्रांगणीं !
संध्या आणि उषा दिगंति दडल्या त्या भैरवीच्या भयें
रक्ताच्या सरितेंत रक्त कमेला खेळे गजांच्या सवें १३

आकाशीं किति मांस खंड उडती खड्गप्रहारांतरीं
त्यांतें भक्षाति गृध्रवायस किती संग्रामभूमीवरी
वाटे कीं रवितामगोल फुटला तत्खंड हे पातले !
जास्वंदीसम तें रणांगण तदा आरक्तता पावलें १४

शीर्षच्छिन्न कलेवरेंहि पडलीं तेथें हयांचीं किती
त्याखालीं चिरडून वीर पडले नाहीं तयांची मिती
कोणी पादविहीन, भग्नकर वा विच्छिन्न कोणी पडे
ईशध्याननिमग्न वीर निघती वैकुंठमार्गाकडे १५

कोणाचे पदहीन देह पडती देहीं कुणाच्या तरी
कोणाचे करहीन देह दडती जाऊन वृक्षांतरीं
कंठीं कंठ कितीक ठेउन महानिद्रावशी जाहले
होते जे उरले तदायु गमलें संपेल कीं संपलें १६

१ त्या क्रुद्ध प्रतापरमणीस २ प्रतापरमणी.

होती संनिकटी तरंगिणि तरी पाणी तिचें प्यावया
कोणीही न तृषार्त वीर शकला तेथें स्वयें जावया
' पाणी पाणि ' करून जीव सुकले; तोंडें कितीं वासलीं
पाण्याचा नच थेंब, रक्त, वदनीं, ऐशी गती जाहली १७

पुष्पांच्या शयनावरी सुखभरें जी झोंपली मंचकीं
युद्धीं घर्मजलें तदीय भिजली आंगांतली कंचुकी
घालाया प्रियकंठहार सजले जे हस्त शय्येवरी
त्या हस्तें अतुल प्रताप अरिला दावी जगत्सुंदरी १८

वृक्षांच्या शिखरावरी विहरती जे पाक्षि नादस्वरीं
पंखांनीं तनु आवळोनि बसले भीतीमुळें कोटरीं
झाले स्तब्ध, न शब्द काढिति मुखीं भेसूरता पाहुनी
" मोठ्यांच्या कलहीं लहान बसती देहास संरक्षुनी १९

पृथ्वीच्या प्रळयांत सूर्यकिरणीं आरक्त मोठे गिरी
स्थानभ्रष्ट इतस्ततां भटकती सिंधुप्रवाहावरी
मागें आणि पुढें तसे चहुंकडे सक्रोध जे धांवती
नेत्रानंदकरी प्रतापलहरी सारी तया ती सती २०

ज्याची पत्नि अशी धुरंधरवती जी क्षात्रकर्मोचिता
भर्ता विक्रमकीर्तिवंत न कळे कैसा असेल स्वतां

त्यांशीं गांठ रणांगणांत पडतां होईल कैशी दशा ?
भीतांच्या हृदयांत यापरि शिरे उद्विग्नतेची निशा २१

' दैवानें जगतील, येतिल पती खैरात वाटूं जनीं
बोलूं शांतपणें विलासभवनीं कंठास आलिंगुनी '
गेहीं त्या अरिपत्निला श्रुत न कीं ' संसार आटोपला ' !
' चिंतामानस एक, अन्य घडतें दुष्कर्म येतें फळा ' २२

विश्रांती सुकुमारिला पळभरी लाधे न युद्धांगणीं
जीवाचें नव्हतें कुणी, कळवळा यावा कुणाच्या मनीं
व्योमीं विद्रुत मेघखंड करिते जैशी मरुद्वीचि ती
थोडेसे उरले, असंख्य पडले झाली अशी तद्गती २३

मोठे पर्वत टाकिले उलथुनी, यांची कथा काय ती
सारा सागर पोहिला, नच तिला कासार[1] याची क्षिती
शक्तीचा अवशेष योधिनि[2] करी उत्साहसंवर्धनीं
भामो शस्त्रकरास तीव्र मिरवी दुष्टांस संमर्दुनी २४

हा ! हा ! काय परंतु सैन्य दुसरें आलें कुठोनी रणीं ?
मेलेले उठले पुन्हा अहि मही वाटे मनीं त्या क्षणीं
दुष्टांना चढलें रणस्फुरण तों धैर्योत्तमा कांपली
तेव्हां योगिनि ती हताश हृदयीं चिंताज्वरें भाजली २५

१ सरोवर २ प्रतापरमणी

... ग्रंथ संग्रहालय ... नं. ........

" हे प्राणेश्वर ! लोकपाळ वससी अज्ञात जागीं कुठें
दासीची तव दर्शनाविषयिंची आशाच आतां खुटे
ये ये धांवुन संकटांत समयीं संग्रामचूडामणी !
सिंहाची रमणी वृका न सुलभा, दे प्रत्यया आणुनी २६

वैडूर्यप्रभ पुच्छभार अपुला झांकोनिया बर्हिणी
आलेल्या असतील संकट–कथा सांगावयालागुनी
त्यांचे जे गळतील बिंदु नयनीं त्यातें तरी पाहुनी
येथें फोडित गर्जना लवकरी यावें तुवां धांवुनी २७

उच्छ्वास स्फुरिताधरा द्रुतगती येतील सारंगिणी
झाल्या विद्रुत येथुनी तुजपुढें सांगावया काहणी
दासी दारुण संकटांत पडली ऐसें मनीं जाणुनी
त्यांच्या पादपथावरून चतुरा ! ये ! ये सख्या ! धांवुनी २८

चिंतास्पृष्ट विषादयुक्त शकुनें होतील तूंतें प्रिया !
डावा नेत्र पुनः पुन्हां विचलतां होशील शंकी सया !
भीतिग्रस्त तदा विहंगगण जी येई दिशा सोडुनी
काळाचें प्रतिरूप घेत इकडे यावें तुवां धांवुनी २९

वायूच्या लहरींतली तुज जरी भाषा कळोनी न ये
धूळीचे दिसले न लोळ तरि कां पृथ्वीपते ! भव्य हे

एखाद्या कुहरीं निमग्न असशी कीं अन्य तूं चिंतनीं
दैवाचें मजला न दुःख चुकतें हें भोगल्यावांचुनी ३०

होवो होइल काय तें, भय नसे माझें मला सर्वथा
शूराची प्रमदा मरेल अथवा मारील हें नान्यथा
माझें ऐकुनिया अनिष्ट तुजला वाटेल काय प्रिया ?
त्वद्वज्रोपमही फुटेल हृदय प्राणेश्वरा ! राजया ! ३१

माझें प्रेत बघून त्यावर सख्या ! बाष्पांस गाळूं नको
मन्मोहें निजदेश मुक्त करण्या संमूढ होऊं नको
दास्यापासुन देश मुक्त करणें, हें ब्रीद सांभाळणें
कर्तव्याविण सर्व सूज्ञ वदती धिक् मानवाचें जिणें ” ३२

वृक्षांच्या शरिरास कंप सुटला जों वायु उच्छ्वासला
पक्षिश्वापदघोष होय भंवतीं दिक्प्रांत नादावला
आला काय सखा वळून बघते मागें मृगाक्षी पुन्हां
आशाबद्ध मनास ती फसविते उत्कंठिता कामना ३३

“ तूं येतां रणसज्ज खड्गधृतवान् सामंतचूडामणी !
शौर्यश्रीभुजदंडमंडित असा कोदंड वा घेउनी
शेषाचें शिर हालुनी वसुमती कांपेल ती त्वद्भयें
मेरूचीं शिखरें प्रकंपित तशीं ! होतील तीं निश्चयें ३४

क्रूरांचा जमला जरी कळप हा शार्दूल तूं राजया !
कंठच्छेदन रक्तशोषण तुला ह्या ज्ञात युद्धक्रिया
हे शक्तिप्रबला खरीच अबला झाल्यें लढूं मी कशी ?
झाली हस्तगता प्रतापरमणी दुष्कीर्ति ना हो अशी ३५

अंतःक्लेशवती विकारवश ती तैं जाहली शर्मदा
दुःशद्बें अपमानभूत परिसे तों आत्मनिंदा तदा
दृष्टिक्षेप करी सभोंवतिं बघे सेनाब्धिला एकटी
" मातोश्री ! जय अंबिके ! ह्मणुनिया घाली उडी शेवटीं

हंसी पक्षबलें पुढें सरकली काकोलही धांवले
मृद्वंगीस करीत दंश सुटले संघैक्यशक्तीमुळें
रक्तस्राव घडून शक्ति सरली तों घाव आला शिरीं
झाली शक्तिहता विमूर्च्छ पडली धारांगणीं सुंदरी ३७

जाईची लतिका धरेवरि पडे तों दुष्ट आनंदले
सेनेच्या अधिपास धन्य विजयीं चित्तीं किती वाटलें
घेई बांधुन आपुल्याच तुरगीं मेवाडमातेश्वरी
अस्तव्यस्त शरीर होय, अदयां आली दया ना तरी ३८

होती दर्शनदुर्लभा तनु जिची सामान्यलोकां जनीं
सौधोत्संगिं शशीस मात्र दिसली तत्तुल्यशोभाननीं

आर्येंची करिती अनार्य विजनीं आबाळ ना पाहवे
राजा रंक असो प्रसंग कसला येईल ना सांगवे ३९

ज्या वेणीवर पद्मपुष्प बघुनी भुंगे सदा धांवती
देवांच्या सखि यत्कलाप बघुनी तैसा करूं पाहती
लोळे त्रस्त अहा ! तुरंगमपदीं तो तीव्र वेगामुळें
घेती बर्हिणि बर्हभार अपुला झांकून भीतीमुळें ४०

साध्वीच्या रुधिरांत दिव्य इतुकी कीं शुद्धता बाणली
नाथावीण दिनेशरश्मि शिवतां त्या कृष्णता पातली
होतें शुद्धचि तें, ‘ अशुद्ध ’ ठरलें सूर्यापकृत्यामुळे
एकाची कृति दूषणीय, दुसरा कां निंद्य हें ना कळे ४१

शोभावी जिचिया उरोजकलशीं मंदारपुष्पावली
वायूनें सरतां दुकूल उडते त्या धूलि वक्षस्थलीं !
‘ बिंबोष्ठी ’ तिजला विशेषण मिळे ज्या ओष्ठ्यवर्णावरी
ते वाळून विवर्ण आज दिसती शुष्क प्रवालापरी ४२

मूर्च्छी नेत्रनिमीलिता, कमलिनी सुप्ता गमे योगिनी
कांतिक्षीण कलावशेष गमली बालेंदुमंदानना
नेली मोहिनि राहुनें अमरही आले न रक्षावया !
ज्याचा तोच असे विपत्तिसमयीं आपत्ति भोगावया ४३

जातांना पतिमागुनी निरखिली ज्यांनीं मनोहारिणी
आशिर्वाद दिले सुखी पुनरपी येवो प्रजानंदिनी
दुःखानें वनदेवता किसलयीं नेत्राश्रु त्या गाळिती
सत्पुष्पाभरणें लता त्यजुनिया खिन्नाननें बैसती ४४

---

## सर्ग ४ था.

आपली धर्मपत्नी असहाय स्थितींत मोंगलाशीं लढली, शेवटीं तिला विमूर्च्छ स्थितींत मोंगल घेऊन चालले. ही वार्ता प्रतापास कळतांच तो अरवली पर्वतांतून भिल्लांचें सैन्य घेऊन गर्जना करीत मोंगल सैन्यामागें लागला. वाटेंत त्याच्या धर्मपत्नीनें केलेल्या युद्धाचा भीषण देखावा त्यानें पाहिला. पुढें मोंगलाबरोबर त्याचें तुंबळ युद्ध झालें. ज्या मोंगलनिशाणा जवळ प्रतापाची धर्मललना मूर्च्छित स्थितींत पडली होती त्या निशाणाचे तणावे कापून त्यानें तो शत्रूचा ध्वज लाथेनें उलथून पाडिला ! तेव्हां तेथें भीषण रणकंदन झालें. राणा प्रताप आपल्या अर्धांगीजवळ आला. त्यानें तिचें शीर्ष आपल्या मांडीवर घेतलें. तिचें रक्त पुसिलें. तिनें डोळे उघडिले. आपल्या प्राणेश्वरास पाहिलें व पुन्हां नेत्र झांकले ! राणाजीनें तिला एका पालखींत घालून तिच्या सुश्रुषेची व्यवस्था केली व तो पुन्हा रिपुकंदनास लागला. सर्व मोंगल सैन्याची वाताहत झाली. व राणाप्रताप यास विजय प्राप्त झाला.

[ वसंततिलका ]

**राणाप्रतापः—**

नेली प्रतापरमणी नव चारुगात्री
ना पाहवें अरवली गिरिला स्वनेत्रीं
ऐशी करी हृदयकंपद गर्जना तो
कीं, भूमिकंप म्हणती जन काय होतो ? १

निद्रिस्त वन्यमृग जागृत तैं जहाले
वृक्षावरील खग ते सगळे पळाले
होई विकंपित मरुल्लहरी–विलास
तोयप्रपात मुकले सरला गतीस २

चिंताकुला अखिल मोंगलवीरसेना
पाहे पराङ्मुखवती भयवेपमाना[1]
हा ! हा प्रताप रणकेसरि काय आला !
घालील हा यम जिवांवरि आज घाला ३

पाठीस भिल्ल शबरान्वित उग्र सैन्य
हातांत भव्य नव चर्म तसा कृपाण
उल्लंघितो विषम मार्ग गिरीगुहांचे
हारील तेज अमुच्या विजयी मुखाचें ४

प्रक्षुब्ध वारिधर त्यापरि वेगधारी
क्रोधें पुनः पुनरपी प्रतिघोषकारी
जों जों समीप दिसला खलवृंदशास्ता
तों तों उरांत धडकी भरली समस्तां ५

तीरावरील रमणीकृत युद्धचिन्हें
पाहे सबाष्प नयनीं नृप संभ्रमानें

---

१ भयानें कांपणारी

" तूं ! धन्य वीरललने ! असहाय कालीं
मांसास्थिशोणितयुता रणभूमि केली ! ६

तूं जाहली असाशिल श्रमिता स्वदेहीं
मन्मार्ग तूं बघितला असशील देवी !
आकाश फाडुन विदारुन पर्वताला
आलों न घोर समयीं, विधियोगलीला ! ७

कुंदोज्ज्वला समरसिंजितरक्तकांता
मूर्च्छान्विता नयनमीलितवृत्ति शांता
संग्रामधूलिमालिना रिपुपाशबद्धा
मी धांवलों परिसुनी तव घोर वार्ता " ८

**घनघोरयुद्धः-**

युद्धार्थ कार्मुक-गुणीं शर योजणारा
दिव्य प्रभाव मिरवूं मनिं इच्छिणारा
उद्दीप्त कोपदहनीं रिपु जाळणारा
घेऊन सैनिक-समूह निघे पुढारा ९

चित्तास चापपरुषध्वनि भीति देई
बाणप्रबंधनिकरीं रवि लुप्त होई
स्वर्लोकदेवयुवती ह्मणती " अगाई !
हा क्षात्रधर्म विषमाचरणीय बाई ! " १०

... ग्रंथ संग्रहालय ... नं. ४१ ... ठाणे

सामर्थ्यहीन यवनी चमुच्या समीप
गेला त्वरें रणविशारद तो प्रताप
" श्री एकलिंग ! जयशंकर ! " शद्वघोष
मेघासमान गमला रिपुमानसास ११

भात्यांतुनी शर कदा निघती कळेना
चापीं नियोजिति कसे दिसतें न कोणा
कर्णांतकृष्ट दिसती धनुचे त्रिकोण
आकाशभाग सगळा शरजालपूर्ण १२

एकेक बाण हरितो रिपु दोन तीन
प्राणांत शीघ्र करिती शर वेगवान
मागून तेहि रिपुशोणित-रक्तदेही
जाती बुडून समरीं रुधिर-प्रवाहीं १३

ओढून ओढुन धनुर्गुण तैं भटांच्या
अंगुष्ठ-तर्जनि अहा ! फुटल्या तयांच्या
वीरार्थ जीं उतरलीं समरीं विमानें
त्यांची न होय गणना कविच्या मुखानें १४

होवो किती श्रम न त्यासहि मानणारे
भूपार्थ आत्मतनुला तृण मानणारे

रुद्रावतार गमला नृप--सैन्यभार
युद्धांगणीं रिपुवरी करिती प्रहार १५

मागें न पाय फिरला पुढचा कदापी
राणा प्रताप तर तो समरप्रतापी !
स्वर्गांतले पितर तुष्ट करीत होता
देवांचिया हृदयिं हर्ष भरीत होता १६

ढालेवरी खटखटा बसती प्रहार
तो पेटला हटतटासचि वीरभार
आरंभिला खणखणाट अशा परीचा
कर्णीं न ये कलकलाट मुळीं रिपूंचा १७

ते सर्वही महिष, हा बलिदानकारी
चंडीस तुष्ट करण्यास्तव त्यां विदारी
घातासवें उडति मस्तक--कंदुकें तीं
धारेपरी घडतसे रुधिरांबुवृष्टि १८

स्वर्गांत काय सुरदानव झुंजतात ?
तेथून कां पतन सैनिक पावतात ?
झाली प्रदीप्त दहनासम युद्धभूमी
कित्येक वीर पडती रणयज्ञहोमीं १९

युद्धोन्मदांत लढतां लढतां जयांचें
गेलें उडून शिर, उग्र कबंध नाचे
राशीवरी पडति राशि कलेवरांच्या
ढाला रणीं न गिरल्या तरि मोगलांच्या ! २०

योद्धे अमीर उमराव पठाण खान
ईर्षेंत वीर चढले भय तें त्यजून
हुंकार देत लढती सरती न मागें
थोडेंहि मृत्युभय यत् हृदयीं न वागे २१

खाद्धन घाव बसतां वरतीं उडावें
येतां प्रहार वरुनी चुकवून जावें
छातीस छाति भिडली तरि छातिचे ते
वीराग्रणी अरिवधास्तव सिद्ध होते २२

एकें दुज्यास धरणीवर लोळवावें !
त्याला कुणी उदर रोंखुन भोसकावें !
दिल्ली कुठें अरवलीगिरि-भूमि ! कोठें
ती जन्मभूमि, मरणस्थल हाय ! कोठें ! २३

सिंहावलोकन करी नृपराज जेव्हां
होई प्रकंपित मनीं दळभार तेव्हां

तो सोक्षमोक्ष करण्यास्तव शक्ति--धीर
'घे घे' करीत सुटला समरज्ञ वीर २४

केतूस तो अनुसरे प्रळयांतकारी
जेथें स्वकीय ललना विकलांगधारी
कोलाहल प्रबल होय धुरंधरांचा
तेथें समूह जमला विजयी भटांचा २५

झांकून मेघपटलीं रवि जाय जैसा
संशप्तकांत नर अर्जुन मग्न जैसा
चोहींकडून वळले यवन प्रतापी
वज्रांग धैर्यधर त्या अतुल प्रतापीं २६

**प्रतापरमणीः-**

होता असा चपल पेलित खड्ग–हस्त
केले तटस्थ भंवतीं रिपु ते समस्त
आला ध्वजाजवळ यापरि झुंज देतां
तों देखिली दुरुन बद्धवती स्वकांता २७

ती कामधेनु नडली पडली अकालीं
कांट्यांत काय सुकली सुकली चमेली !
पाहे सभोंवति सती उघडोनि डोळे
तों तीस नाथ दिसला, मन शांत झालें २८

" हे प्राणनाथ !–" विदुला वदण्यास पाही
तों कंठ सद्गदित होउन बाष्प वाही
शक्तीविहीन कर जों उचलूं पहाते
थोडा उठून पडतो धरणीतलातें ! २९

कर्णाकडे नयनबिंदु वहात जाती
दुःखध्वनी उमटती जरि आवरी ती
विस्रब्ध रक्त फुटलें तनुचालनेनें
ग्लानींत नेत्र मिटले श्रमिताननेनें ३०

जी शोचनीय गति पाहुन कींव यावी
कैशी नितांत कुसुमावतिनें सहावी
ती केतकी निरखिली अरिपाशबद्धा
क्रोधानलें भडकला रजपूत योद्धा ३१

प्रेमी जनास अतिदुर्धर संकटांत
पाहूं शके कवण विक्रमशक्तिमंत
सर्वांस भूप गमला अनिवारणीय
दावानल प्रशमवूं शकतील कोण ? ३२

**प्रतापाचा तुमुलसंग्रामः–**

जेथें गळेल विभुशोणितबिंदु साचा
देतील तेथ बळि जे अपुल्या तनूचा

संरक्षणास शबरोत्तम धांवले ते
भूपस्वरूप अपुल्या प्रिय दैवतातें ३३

ढालेस ढाल भिडली उठली धुमाळी
राष्ट्रध्वजापुढति भीषण झुंज झाली
मेवाडलक्ष्मि-निटिलीं विधिलेख काय ?
हा प्रश्न तेथ सुटणार विशंकनीय ३४

भीष्मप्रतिज्ञ कुलकीर्ति विवर्धिणारा
धारांगणीं रुधिरबिंदु समर्पिणारा
स्वर्गापगाजल-महाघ असा पुढारी
वृक्षांसमान करि कंपित सर्व वैरी ३५

वायूच तो कदलिकाननगनाशकारी
कीं मत्त कुंजर लतातरुछेदकारी
केले अनंत शकलीकृत देहवंत
तो मूर्तिमंत गमला सकलां कृतांत ३६

कोणी म्हणे प्रकट हा मदनांतकारी
कोणी म्हणे कुपित हा गमतो मुरारी
वाटे परंतु कविला रणयज्ञकुंड
देतां नराहुति तदा भडके प्रचंड ३७

" काबूल काश्मिर पिशावर हिंदुनीया
आलों कशास इकडे यश जाय वाया "
चित्तीं असा प्रकटिती अनुताप वैरी
दुर्दैव तें छळतसे मनुजास भारी ३८

शस्त्राभिघातकुशली चिरितो तणावे
पादप्रहार करण्या उसळून धावे !
भूमिस्थळीं उलथला ध्वज मोगलांचा
जीवांत जीव नुरला पळत्या जनांचा ३९

कल्लोल फार उठला, फुटला समूह
प्रत्येक वीर वदला ' प्रभु धाव धाव '
दे माय हाय धरणी ! शरिरास ठाव
दे भीति फार अरिला रजपूत नांव ४०

शेळ्या जणो यवन, ते वृक भिल्ल मागें
हा ! हा ! करीत पडती पळती सवेगें
गेले थकून, समरीं हतवीर्य झाले
थोडेच मात्र उरले बहुतेक मेले ४१

मेवाडभूपतिसवें यवनाधिपाचा
संग्राम अद्भुत घडे बलसागरांचा

अन्योन्य वीर करिती असिघात शीर्षी
मेघासमान गमले रुधिरांबुवर्षी ४२

जों वीरवंशज रिपूवर घाव घाली
वृक्षासमान पडला उलथून खालीं
आयुष्य काढिति किती पळ एक एक
एका क्षणांत वरिती मृतिला कितीक ४३

दोर्दंड-शत्रुबलहारक भीमतुल्य
यन्मानसांत महिषीनवदु:ख-शल्य
त्यांकीं तिचें शिर करीं उचलून घेई
हस्तें पुशी रुधिर बोलुन धीर देई ! ४४

जों नाथहस्त शिवला तनु कोमलेला
पाही तदा सुदति ती उघडोनि डोळा.
मर्यादशील युवती उठण्यास पाही
राजा प्रताप वदला ' श्रम हे न वाहीं ' ४५

सोडी स्वकीय कटिचा बहुमोल शेला
भूपें व्रणावर करें दृढ बांधियेला
दासांकडून नववाहनिका करून
तीतें मधें बसविली तनु सांवरून ४६

बोलावयास नव्हती अभियुक्त वेळ
जो जाय तो पळ गमे हृदयीं अमोल
दिल्लीस एक न कुणी परतून जावो
भाग्योदयास शुभदायक काल होवो ४७

व्यापी दिशांस जयसूचक वाद्यघोष
प्रत्येक वीरवर गर्जतसे सहर्ष
ऐशा चमूसह उदङ्मुख होउनीया
तो चालला नृप पुन्हां अरि संहराया ४८

जोडून हात शरणागत सर्व येती
जाणे नृपाळ--शरणागत युद्धनीती
मेले किती खल मदोद्धत दुःस्वभावें
कीं मृत्तिकाघट शिळेवरतीं फुटावे ४९

---

## सर्ग ५ वा.

मोंगलांचा पराभव केल्यानंतर विजयी प्रतापानें जवळच्याच एका गांवीं आपल्या सैन्याचा तळ दिला. तो गांव त्याच्याच हद्दींतील होता. गांवांतील लोकांना आनंद झाला. ते राजदर्शनास गेले. गांवांतील कुलीन स्त्रियांही राणीस भेटल्या. त्यांनीं आपल्या प्रभूची चांगली व्यवस्था ठेविली. राणीची प्रकृति चांगली होईपर्यंत तेथेंच राहण्याविषयीं त्यांनीं राणाजीस आग्रह केला. पण ही वेळ किती महत्वाची, हें प्रतापानें समजावून सांगितलें. नंतर ते लोकही शस्त्रास्त्रें घेऊन प्रतापाचे सैनिक झाले. ठिक

ठिकाणीं मोंगलांचा पराभव करून राणा प्रतापानें मेवाडदेश स्वतंत्र केला. व आपल्या उदेपूर राजधानींत पराक्रमार्जित सिंहासनावर तो अधिष्ठित झाला.

(रथोद्धता.)

**सायंकाल वर्णनः-**

श्रीसहस्रकर अस्तपर्वतीं
घेइ दिग्विजयशांति संप्रतीं
पश्चिमा मधुर हास्य दावितें
कांति तीच अरुणा विराजते १

शृंगराजशिखरीं रविप्रभा
हेमसानु दिसतो जणो उभा
पक्षिजाति वळती गृहाप्रति
रम्य पंक्ति गगनांत शोभती २

सेविती जलद रक्तवर्णता
अंबरीं विलसली मनोज्ञता
कीं प्रभा गिरिमुखास सादृशा
ती गमे गगनपश्चिमा-दिशा ३

पद्मकोपगत षट्पदावली
सेवुनी मधु न तृप्त जाहली
भृंगसंग नलिनीशिं रंगला
हा जनांत अति लोभ निंदिला ४

मराठी ग्रंथ संग्रहालय
दा. क. 3953
शाखा (स्थळ प्रत)

चालतां मृग वळून पाहती
मागुनी हरिणबाल धांवती
उंच कर्ण भयवृत्ति दाविती
थांबुनी द्रुतगतींत धांवती ५

क्षेत्रकर्मरत लोक संप्रतीं
मंद मंद वळती गृहाप्रती
शांत विश्रमित तन्मनस्थिति
कार्यसिद्धि हरिते श्रम निश्चितीं ६

बालकुंतल हळूच सारिती
नाथमार्ग युवती निरीक्षिती
भूषवीति अलकावती गृहें
तारका बघति अंबरीं स्पृहें ७

" थांब, येतिल अतांच ते घरीं
बाळ! घेतिल तुला कडेवरी "
तातदर्शनसुखेच्छुबालकां
बोलताति मृदु बोल बायका. ८

**ज्योत्स्ना वर्णनः-**

अंबरीं तरणि-दीप लोपला
अंधकार रिपु मत्त जाहला

प्राक्दिशेस दिसता निशाकर
सेविती तिमिर अद्रिकूहर ९

चंद्रशीतकिरणीं वसुंधरा
स्वांतशांत गमली मनोहरा
कौमुदी धवल वस्त्र नेसली
कामिनीसदृश रात्र वाटली १०

त्या विशाल सुरमंदिरावर
शुभ्र जें छत दिलें मनोहर
तें सुटून पडलें महीतळीं
चंद्रिका धवल तेंवि भासली ११

जान्हवीसगरबालसंस्तुता
शुभ्र शीकरजलौघसंयुता
नित्य नित्य ' जय '–शद्बनादिनी
होय काय मरुभूप्रवाहिनी १२

यक्ष किन्नर निसर्ग गायक
गाति ते विबुधकीर्तिसेवक
ओघ काय वळला तिचा अहा !
स्वर्गवाक्ष गमतो शशांक हा १३

विष्णुकंठमणि मुक्त जाहला
स्वर्नदींत पतनास पावला
तोच हा विधु विलोल भासतो
शांततेज वितरीत डोलतो १४

कीं सरीं कुमुदिनी प्रफुल्लता
हांसती प्रियचकोर-मंडिता
एकभाव उभयांत राहतो
प्रीतिसंगमविलोभनीय तो १५

संगरश्रमविनीत व्हावया
चांद्रिकेस चमु सेविते तया
ग्राम जें निकट, लोक तेथले
राजदर्शनसुखार्थ हर्षले १६

**नृपातिथ्यः-**

खड्ग शोभति कटीस वांकडें
राव ठाकुर निघे नृपाकडे
येउनी करिति वंदनक्रिया
तोहि पार्थिव समाश्वसी तया १७

ती प्रतापरमणी शुभंकरी-
नाथकंठ-विलग्न सुंदरी

दुःखताप विकलांगना निशी
निद्रिता नच विबोधिता अशी १८

भेटण्यास तिजला कुलांगना-
पातल्या हृदयशुद्धकामना
वंदिती विविधवस्त्रधारिणी
आदरें बसवि त्यांस राजिनी १९

भोज्य वस्तु जन अर्पितात जे–
आणखी पुसाति 'काय पाहिजे?'
राजनिष्ठ वदती मुखें अहा!
राजयोग घडला प्रजेस हा. २०

प्रार्थिती जन वितारितांजली
देविची प्रकृति होय चांगली
तोंवरी बसति येथ पावणें
भक्तिचा उचित मान ठेवणें २१

धूर्जटीनवशशी कलावती
वेदनाक्रमवती कृशांगि ती
पारिजातकुसुमावती सती
अध्वखेद तरि केवि साहि ती! २२

तो वदे:– “ उदयकाल बोलवी
प्रीतियोग तुमचा विमोहवी
राजभक्ति वितरी पवित्रता
आळवीहि मजला स्वतंत्रता २३

धर्मपत्नि बहु कष्ट साहते
जन्मभूमि परि साश्रु बाहते
देशकार्य करितां जगीं खरे
आप्तसौख्य बघणें नव्हे बरें २४

राजभक्ति तुमची स्वयंभुवा
प्रश्न हा उपजवी मला नवा
चित्तभंग तुमचा करूं तरी
स्नेहबंध तुटतो न अंतरीं ! २५

देश आश्रयविहीन हा दिसे
स्थैर्य येथ करणें तरी कसें ?
जन्मभूमि उघडी पडे अहा !
एक वेळ तिजला तरी पहा २६

चेतना स्फुरवि वाक्सरस्वती
लोचनांत जलबिंदु टाकती

---

१ मेवाड. २ कोंबड्याचा शब्द.

खड्गधारि बलवंत त्यासवें
जाहले तदनुचारि ते नवे २७

**प्रतापाचें प्रस्थानः-**

प्राक्दिशेस अरुणांशु ठाकला
ताम्रचूड[२]रव कार्णी ऐकिला
दुंदुभी चमुस दे तदा स्मृति
जाहलें स्फुरण तैं भटांप्रति २८

इंद्रचापपरिवेष–शोभिनी
हेमरूपरसरंगमंडिनी
ती उषा स्मितमुखी विलासिनी
वस्त्र सांवरित ये सुवासिनी २९

प्रस्थितोत्तरदिशीं उदेपुरीं
म्लेंच्छभार उतरावया त्वरीं
चालला प्रथित राजकेसरी
त्यास होति शकुनें किती तरी ३०

पक्षिवर्ग तरुवल्लिकांवरी
काढिती मधुर कंठमाधुरी
रत्नकांतिसम पुच्छवाहिनी
नाचतात पथिकीं मयूरिणी ३१

मराठी ग्रंथ संग्रहालय ठाणे

पल्लवप्रसरिता द्रुमावली
वायुसंचित सर्व जाहली
पुष्पकेसर विकीर्ण होउनी
राजशीर्षि पडतात येउनी ३२

सव्य भागिं उगवे प्रभामणि[1]
वामभागिं करिती खग ध्वनी
आग्रभागिं मृगवृंद धावतो
तासपक्षि गगनांत बोलतो ३३

जो करी निजपदांकिता मही
येतसे प्रबलवीर निग्रही
'गोहिले[2]', 'हटिले[2]' जागजागचे
धोलपूर अजमीर कोटचे- ३४

-येउनी मिळति त्या महोदया
यादवी विसरले करावया
यावरी अधम राहिले तया
यातना न चुकल्या सहावया ३५

धैर्यवंत निजभूप लाभला
लाभ हाच गमला जनीं भला

१ सूर्य. २ रजपूतांच्या जाती.

लागती जन तदीय पावलां
पावला म्हणति देव पावला ! ३६

नाचवीत नृप केतु चालला
रक्तयुक्त महिखंड जाहला
' ला इलाह ' रिपु बोलुं लागला
लाग शोधुन मनांत भागला ३७

जेथ जेथ जयदंड नाचला
तेथ तेथ भट–संघ लोटला
चालला नृपति कार्ययोजक
जन्मभूमिजनदर्शनोत्सुक ३८

**राजधानींत प्रवेशः-**

येतसे सदय नाथ पाहुनी
दावि हास्य नगरी वियोगिनी
आम्रपल्लवनियुक्त तोरणें
दर्शनीय दिसती गृहांगणें ३९

केशरप्रहित नीर सिंचिलें
गंधयुक्त पुरमार्ग जाहले
पद्मकांतिसमहस्तबालिका
काढिती विविध रंगवल्लिका ४०

रत्नकांतिमय कर्णकुंडलें
हालती अलक पुष्पकुड्मलें
सुंदरीमुखशशी विलोभले
त्यामुळें गृहगवाक्ष शोभले ४१

राजमंत्रि, पुरवासि, वाक्पती
वेष मोहक तदीय संप्रतीं
सूत्रसंकलित संघ ठाकला
तोंच भूप पुढतीं विराजला ४२

भालदार ललकारिती किती
' श्रीप्रताप जय ' शब्द बोलती
पालखींत नृपराज बैसला
मागुनी जनसमूह चालला ४३

मंगल ध्वनि अपार जाहले
मेघमंडल नभांत कांपलें
तो प्रसंग हृदयास हालवी
' धन्य धन्य ' वदतीलही कवी ४४

हर्षलें अमर ते यशोन्मनी
अप्सरा करिति नृत्य गायनीं

वायु गंध पसरी चहूंकडे
दु:ख एक न जनांत सांपडे ४५

वाहती जन सुपुष्प--मालिका
झांकली रुचिर राजवाहिका[१]
बैसला नृप गर्जी जनास्तव
भाट लोक करितात तत्स्तव ४६

चाप बाणयुत भिल्ल सैनिक
पाहुनी करिति लोक कौतुक
पूजनार्ह गमले समस्त ते
कीं सहायक यशोपलब्धितें ४७

जो गुलाल जनताकरांतला
भूतलावर उडून पातला
लाल लाल पथ सर्व जाहला
पावलें उमटतात त्या स्थला. ४८

व्याधिमुक्त धरणीश्वरांगना
शोभवी पतिसवें शुभानना
चंद्र आणि जणु चंद्रिका जनीं
भासती उभय ते प्रतिक्षणीं ४९

---

१ पालखी.

तो प्रताप बसला निजासनीं
तोषली जनसभा तदा मनीं
वर्णिला किति जरी प्रसंग तों
राहिला तरि अपूर्ण वाटतो. ५०

---

तिवारी कवि

दा. क. 3953
REFBK-0003153
REFBK-0003153

समाप्त.

मराठी ग्रंथ संग्रहालय
नं.
ता.
ठाणे.